# गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली

## लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

## बी.ए. तृतीय वर्ष (सत्र - VI)

## प्रकल्प अहवाल

## सत्र - २०२१ - २२

"भारतातील कौटूंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रिय अध्ययन"


संशोधक

कु. लक्ष्मी वासुदेव करलूके

बी.ए. तृतीय वर्ष

मार्गदर्शक

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार

समाजशास्त्र प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

# अनुक्रमाणिका

* प्रकरण पहिले

साहित्य अध्ययन
अ) प्रस्तावना आणि इतिहास

* प्रकरण दुसरे

अ) अध्ययन पद्धती व पूर्व साहित्याचा अभ्यास
ब) वैशिष्ट्ये व स्वरूप

* प्रकरण तिसरे

अ) कौटुंबिक हिंसेची कारणे
ब) कौटुंबिक हिंसाचाराचे परिणाम जाणून घेणे

* प्रकरण चौथे

तथ्य संकलन व विश्लेषण
द्वितीयक तंत्र

* प्रकरण पाचवे

अ) निष्कर्ष, सूचना व शिफारसी
ब) कौटुंबिक हिंसाचारावर उपाययोजना
क) संदर्भ ग्रंथ सूची

भगवती

# मनोगत

लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथे विद्यापीठांतर्गत निरनिराळे अभ्यासक्रम चालवले जातात. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता स्पष्ट करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगी असणारे गुण मार्गदर्शकांपर्यंत कसे पोहचावे या प्रकल्पाच्या माध्यमातून दर्शविले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी वस्तुनिष्ट दृष्टीकोण सापेक्ष विचार सारणी यावी या करिता प्रकल्प अहवाल मार्गदर्शक ठरविणार आहेत. विद्यार्थ्यांच्या अंगी वैज्ञानिक विचार पद्धतीचा विकास होईल आणि त्यांना त्यांच्या आयुष्यातील कोणत्याही क्षेत्रात वावरतांना कसलीही अडथळा येणार नाही.

माझ्या प्रकल्प अहवाला करिता मी "भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" या संबंधित विषय निवडला नेहमी कौटुंबिक हिंसाचार या विषयी ऐकले होते. तेव्हा कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? हे जाणून घेण्यासाठी संपूर्ण संधी प्रकल्प अहवालाच्या निमित्ताने प्राप्त झाली. त्यानुसार "भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन करायचे ठरवले. त्या करिता आमचे मार्गदर्शक प्रा. श्रीनिवास पिलगुलवार सरांनी विशेष मार्गदर्शन केले. त्या बद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. तसेच आमच्या वाचनालयातील ग्रंथपालांनी जी पुस्तके उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल त्यांची पण आभारी

भगवती

आहेत. तसेच मला माझ्या मैत्रीणींने विशेष सहकार्य केले त्यांची पण आभारी आहे.

# प्रकरण पहिले

## साहित्य अध्ययन

### प्रस्तावना

मनुष्य हा जन्मतः केवळ एक प्राणी असतो. त्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करणाऱ्या प्रक्रियेत कुटुंबाचे स्थान महत्त्वाचे असते. मानवी जीवनातील प्राथमिक व मूलभूत सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्था ओळखली जाते. मानवाच्या सर्व गरजांचे निराकरण व संरक्षण कुटुंबातून होत असते. परंतु लहान मुले, वृद्ध व विशेषतः स्त्रियांसाठी कुटुंब असुरक्षित बनते. स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जाते. कारण भारतात सर्वत्रच घरगुती हिंसाचार ही सर्वसाधारण बाब समजली जाते. परंतु आधुनिक काळात हिंसाचार प्रतिबंध करण्याचे काम सर्वत्र समाजातून होतांना दिसते. आधुनिक काळात हिंसाचार अमानवीय, अनिष्ट मानला जातो. लोकशाहीत हिंसाचारास स्थान नाही. आज कौटुंबिक हिंसाचार ही एक महत्त्वाची सामाजिक समस्या बनली आहे. म्हणून या प्रकरणामध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या अर्थ, व्याप्ती, कौटुंबिक हिंसाचाराची कृत्ये, त्यास जबाबदार कारणे व कौटुंबिक हिंसाचारावरील कायदेशीर व प्रतिबंधात्मक उपाययोजना अभ्यासणार आहोत. दुसऱ्या घटकामध्ये कौटुंबिक हिंसाचारास जबाबदार असणारी दीर्घकाळापासून दूर आलेली हुंडा प्रथा तिचे स्वरूप जाणून घेणार आहोत.

व्यक्तीच्या जीवनात कुटुंबाचे स्थान अनन्यसाधारण आहे. कारण व्यक्तीचे पालन, पोषण, संरक्षण;

भगवती

मानवीकरण, सामाजिकरण कुटुंबातच होत असते. कुटुंबातूनच मानवाच्या भावनिक, मानसिक गरजांची पुर्तता, व्यक्तीमत्व विकसीत होते. व्यक्तीसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणून कुटुंबाकडे पाहिले जाते. परंतू सर्वांसाठीच कुटुंब सुरक्षित असते म्हणता येत नाही. काही वेळा कुटुंबातील प्रौढ व्यक्ती आपल्या नात्याच्या वयाच्या, सत्तेच्या दुरुपयोग करून घरातील इतरांना आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. अशा दबावाचा, हिंसाचाराच्या लहान मुले, स्त्रिया व वृद्ध बळी पडतात परंतू भारतामध्ये कौटुंबिक हिंसाचाराला स्त्रियाच बळी पडतात. पती व सासरच्या व्यक्तीकडून विवाहीत स्त्रीचा होणारा छळ सार्वत्रिक स्वरुपाची घटना बनत आहे. भारतात इतक्या सहजपणे ही बाब घेतली जाते. तर आई-वडिलांच्या घरी मुलींना मिळणारी भेदभाव पूर्ण वागणूक वा छळ हा त्यांचा अधिकारच मानला जातो. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना जोवर गंभिर रुप धारण करीत नाही तोवर दुर्लक्षिल्या जातात. परंतू आधुनिक युगात मानवी हक्क व मूल्यांना महत्त्व प्राप्त झाल्यास समाजात कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध आवाज उठवला जाऊ लागला आहे. त्यातूनच कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करणारा कायदा करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रथम घटकामध्ये आपण कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ त्यांचे स्वरुप, कारणे व उपाय यांचा अभ्यास करणार आहोत.

भगवती

स्त्रियांच्या होणाऱ्या कौटुंबिक छळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 व नियम 2006 संपूर्ण भारतात 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू केला. कायद्याची माहिती नसेल तर त्यांच्या पिडीत महिला लाभ घेवू शकत नाही. कौटुंबिक हिंसाचार कशास म्हणावे हे सर्व सामान्याला समजावे म्हणण्यासाठी हा अभ्यास प्रपंच वास्तविक स्त्रीच्या परीवारा सोबत वा साथीदारासोबत एकाच छताखाली राहात असेल आणि तीच्या छळ त्या पुरुषाकडून होत असेल तर ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्यायदंडाधिकाऱ्या कडे संरक्षण मागु शकते. थोडक्यात पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकाऱ्यासह तीच्या सुरक्षितेच्या आर्थिक संरक्षणाच्या आदेश न्यायदंडाधिकारी देवू शकतात. छळा- पासून संरक्षण मग ते शारीरिक, लैंगीक, आर्थिक, तोंडी, किंवा भावनिक अत्याचार असोत महिलांना त्या विरुद्ध न्याय मागता येते. कौटुंबिक हिंसाचाराला लिंगभेदावर आधारित हिंसाचार असेही म्हटले जाते. कौटुंबिक हिंसाचार हा निःशंकपणे मानवी हक्काचा विषय आहेत.

भारतीय समाजात स्त्रीचे स्थान वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या स्वरुपाचे राहीले आहे. परंतु पितृसत्ताक पद्धतीच्या प्राबल्यामुळे बहुतांश काळात स्त्रीची अवस्था अबलेसारखीच होती. कौटुंबिक हिंसाचार हा प्रामुख्याने स्त्रियांवर होताना पहायला मिळतो. स्त्रियांवर अनेक प्रकारांनी अत्याचार होते. खरेतर आजच्या काळातही या स्थितीत खुप फरक पडला आहे असे नाही आजही स्त्रीला हिंसाचार अत्याचाराला तोंड द्यावे लागते.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने 2005 मध्ये अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर 2006 पासून तसा कायदा संपूर्ण देशभर (जम्मू - काश्मीर) वगळता देशातील सर्व राज्यांना लागू झाला. या कायद्यामुळे महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देण्यात आले.

हा कायदा 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू झाला. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा नि:संशयपणे तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहेत. तसेच तिच्या सर्वांगिण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखलपात्र विषय आहेत.

मानव हा समाजशील प्राणी आहे. म्हणूनच मानवाच्या जीवनात जन्मापासून ते मरेपर्यंत कुटुंब व्यवस्थेचे अनन्यसाधारण महत्व आहे. कारण खऱ्या अर्थाने कुटुंबात व्यक्तीचे संगोपन, पालनपोषण, संरक्षण आणि सर्वांगिण विकास होत असतो. स्त्रियांच्या दृष्टीने तर कुटुंब व्यवस्थेचे अधिकच महत्व आहे. समाजात आज घरोघरी असंख्य देवींची देवघरात मनोभावे पुजा करताना आपण लोकांना पाहतो. पण व्यवहारात मात्र हेच लोक स्त्रियांवर पदोपदी अन्याय, अत्याचार करुन तिची कुचंबणा अवहेलना व समानतेच्या अधिकाराची गळचेप करीत असतात.

अलीकडच्या काळात तर स्त्रीच्या दृष्टीने सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या कुटुंब व्यवस्थेत म्हणजेच स्वतःच्याच घरामध्ये तिच्यावर होणाऱ्या शारीरिक व मानसिक अत्याचारांची तीव्रता थरकाप उडविणारी आहे. समाजातील सर्व स्तरातील, वर्गातील, जातीतील, धर्मातील स्त्रियांना आज कुटुंबातील निकटवर्तियांकडून होणाऱ्या छळाला सामोरे जावे लागत आहे.

गर्भजल परीक्षेचा गैरवापर करून स्त्रीलिंग गर्भ असल्यास त्याचा व गर्भपात करून स्त्रीला जन्माला येऊ न देण्यापासून तिच्यावर कुटुंबातील व्यक्ती अत्याचार सुरू करतात. आणि ती जन्माला आलीच तर आयुष्याच्या विविध टप्प्यांवर भ्रूणहत्येपासून ते ती वृद्ध होईपर्यंत तिच्यावर अत्याचार सुरूच राहतात.

पत्नीला वस्तू समजून तिला चार चौघांमध्ये तुडविणारे पति परमेश्वर कमी नाहीत. तसेच समाजात बदनामी होऊ नये म्हणून किंवा कायद्याच्या भितीपोटी बायकोला शारिरीक मारहाण न करणारे परंतु तिच्यावर रोज मानसिक अत्याचार करणारेही कमी नाहीत. अगदीच काही नाही तर पत्नीचं तिचं स्वतंत्र व्यक्तीमत्व 'स्त्रीधन' समजून सेफ व्हॉल्ट मध्ये टाकून आयुष्यभर 'पडलाय' म्हणून जगावं असा पुरुषार्थ गाजविणारेही थोडेथोडके नाहीत. हे झालं ह्याच्या पत्नीबाबत. परंतु मुलींशीही त्याच मनोवृत्तीतून वागविणारे बापलोकही घराघरात आहेत.

भगवती

कौटुंबिक हिंसाचार हा स्त्रीविरुद्ध होत असलेला सर्वसामान्य आणि सततचा होणारा छळ आहे. ज्या देशात अशा प्रकारच्या हिंसेसंबंधी सखोल अभ्यास केला गेला त्या प्रत्येक देशात असे दिसून आले आहे की देशातील 10 ते 69% बायकांना आपल्या आयुष्यात हिंसेला समोर जावं लागतं आणि तो हिंसाचार आपल्या जवळच्या जोडीदाराकडून होणारा असतो. 12 ते 25% स्त्रियांना बळजबरीने लैंगिकसंबंध वा त्याचा प्रयत्नही आयुष्यात भोगावा लागलेला आहे.

अशा पाहणीतून धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे.

1) स्त्रीविरुद्धच्या हिंसाचाराचा सूत्रधार हा प्रामुख्याने पुरुष असतो.
2) सलगीतांच्या नात्यात (intimate relationship) शारिरिक हिंसाचारा बरोबरच मानसिक व शाब्दिक हिंसाचार जास्त प्रमाणात आढळून येते.
3) चार पैकी एक स्त्री लैंगिक अत्याचाराला बळी पडते.
4) स्त्रीया तिच्या जवळच्या आणि ओळखीच्या पुरुषाकडून हिंसेच्या जास्त धोका असतो.

जगात सर्वत्र महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. घरगुती हिंसाचार हा प्रकार भारतात सर्वत्रच अस्तित्वात असणारा असला तरी सार्वजनिक जीवनात तो अदृश्य असल्याचे दिसते. कारण अशा प्रकारच्या घरगुती छळाबाबत साधारणतः जाहिरपणे बोलले जात नाही.

तसेच विवाहपूर्वी म्हणजेच माहेरच्या घरी आई-वडीलांकडे जो हिंसाचार स्त्रियांवर होतो त्याला तर आपल्या समाजात अजिबात मान्यता नाही. त्याकडे हिंसाचार म्हणून बघितले जात नाही. अशा प्रकारे माहेरी व सासरी महिलांवर होणारा घरगुती अन्याय-अत्याचार बऱ्याचदा अदृश्य राहतो. म्हणून त्याची दखल फारशी घेतली जात नाही.

पण काळानुसार समाजव्यवस्था व एकूण सामाजिक मानसिकता बदलली आणि स्त्रियांना देण्यात येत असलेली दुय्यम वागणूक, स्त्रियांवर व मुलीवर होणारे घरगुती अत्याचाराबाबत संघटितपणे आवाज उठविला जाऊ लागला.

या सर्व बदलांचा परिणाम म्हणून भारतात 1983 मध्ये प्रथमतःच कौटुंबिक हिंसाचाराला, कुटुंबातील निकटवर्तियांकडून स्त्रीवर होणाऱ्या शारीरिक व मानसिक अत्याचाराला गुन्हा मानण्यास प्रारंभ झाला.

भगवती

भारतीय दंड विधानातील कलम ४९८ (अ) या कलमानुसार जर एखाद्या स्त्री स्त्रीवर नवऱ्याने किंवा तिच्या नातेवाईकांनी शारीरिक किंवा मानसिक अत्याचार केलेत. अथवा तिच्यासोबत क्रुरतापुर्ण वागणूक केली तर तो गुन्हा मानल्यात येवू लागला.

परंतु या समस्यांमधील गुंतागुंत तसेच स्त्रियांच्या सुरक्षिततेची निवड या गोष्टी लक्षात घेवून स्त्रियांच्या कौटुंबिक छळ व अत्याचारापासून संरक्षण करणारा व्यापक असा कायद्याची आवश्यकता होती. त्याच्याच परिणाम कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण करणारा कायदा - 2005 संमत करून 26 ऑक्टोबर 2006 रोजी भारतात लागू करण्यात आला.

# कौटुंबिक हिंसाचाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

कौटुंबिक हिंसाचार हा प्रामुख्याने महिलांवर अधिक प्रमाणात पहायला मिळतो. कौटुंबिक हिंसाचाराचा इतिहास पहायचा म्हणल तर हा विशेषत: महिलांवर हिंसाचाराचा इतिहास वैज्ञानिक साहित्यामध्ये अस्पष्ट आहेत. हे एक भाग आहे. कारण स्त्रियांविरुद्ध बऱ्याच प्रकारच्या हिंसा (विशेषत: बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि घरगुती हिंसा) या विषयी अनेकदा सामाजिक नियम, वर्ज्य, कलंक, आणि या विषयाच्या संवेदनशील स्वरुपामुळे केले जाते. हे सर्वत्र ओळखले जाते की आजही विश्वासार्ह आणि सतत डेटाची कमतरता ही महिलांवरील हिंसाचाराच्या इतिहासाच्या मागोवा होणे अवघड आहे. परंतू हे स्पष्ट आहे की हिंसाचाराचा बराचसा भाग स्विकारला गेला. त्याला माफ केले गेले. आणि कायदेशिर रित्या त्याला मंजूर देखिल केले गेले. उदाहरणे यात समाविष्ट आहे. की रोमन कायद्याने पुरुषाने आपल्या पत्नीला दंड देण्याचा अधिकार दिला. अगदी मृत्यू पर्यंत आणि चर्च राज्य या दोघांनीही या गोष्टीचा बडगा उगारला होता. (जरी ही केवळ स्त्रिया विरोधी प्रथा नव्हती) महिलांवरील हिंसाचाराचा इतिहास कौटुंबिक हिंसाचारास स्त्रियांच्या मालमत्तेच्या मैतिहासिक दृष्टीकोनाशी आणि अधिनतेच्या लैंगिक भुमिकेशी संबंधित आहे. हिंसाचाराचे परिवर्तन कौटुंबिक हिंसाचारामध्ये कशाप्रकारे झाले यांचे पूर्ण, सविस्तर इतिहासात नमूद आहेत. कौटुंबिक हिंसाचारामध्ये अनेक प्रकारचे बदल झालेले दिसते. यांचे कारण कौटुंबिक छळ आहेत, कुलपितांचे स्पष्टीकरण आणि

मुकदर जागतिक व्यवस्था किंवा स्थिती ज्यात लैंगिक असमानता अस्तित्वात आहेत. आणि ती कायम राहीली आहेत. त्यांना स्त्रियां वरील हिंसाचाराची व्याप्ती आणि इतिहास स्पष्ट करण्यासाठी उद्धृत उद्धृत केले आहे.

कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी पडणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त आहेत. महिलांवरिल हिंसाचाराच्या निर्मूलनाविषयी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घोषणेत म्हटले आहे की. " महिलांवरील हिंसाचार हे पुरुष आणि स्त्रियामधील ऐतिहासिकदृष्ट्या असमान शक्ती संबंधांचे प्रकटीकरण आहेत. ज्यामूळे पुरुषांद्वारे स्त्रियांवर वर्चस्व आणि भेदभाव वाढला आहे. आणि प्रतिबंध रोखला गेला आहे.

महिलांची पूर्ण प्रगती, आणि महिलां वरील हिंसा ही एक महत्त्वाची सामाजिक यंत्रणा आहेत. ज्याद्वारे पुरुषांच्या तुलनेत महिलांना अधीनस्थ पदावर भाग पाडले जाते. युएनच्या मते, " जगाचा कोणताही प्रदेश नाही, कोणताही देश नाही, आणि असी कोणतीही संस्कृती नाही. ज्यामध्ये हिंसाचारपासून महिलांचे स्वातंत्र्य सुरक्षित केले गेले आहे." जगाच्या ठराविक भागात अनेकदा हिंसाचाराचे प्रकार अधिक प्रमाणात आढळतात.

बऱ्याचदा विकसनशील देश. उदाहरणार्थ, हुंडा हिंसा आणि नववधू जाळणे हा भारत, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळशी संबंधित आहे. ॲसिड फेकणे या देशांशी तसेच कंबोडियासह दक्षिणपूर्व आशियामध्ये देखील संबंधित आहे. ऑनर किलिंग हा मध्य पूर्व आणि दक्षिण आशियाशी संबंधित आहे. मादी जननेंद्रिय विकृती बहुतेक आफ्रिकेत काही प्रमाणात मध्य पूर्व आणि आशियाच्या काही भागात आढळतात. अपहरण करुन विवाह इथिओपिया, मध्य आशिया आणि काकेशसमध्ये आढळला आहे.

एक जबाबदार लोकशाही देश म्हणून स्त्रीला समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कुचराई होत असेल तर आपल्या न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची सोय आपल्या भारतात उपलब्ध आहेत. आपल्यासाठी कोणते कायदे आहे आणि त्यांचा काय उपयोग आहे. हे अनेकदा महिलांनाच माहिती नसते.

अशा प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराचे कायदे कशा प्रकारे तयार आले आणि कोणते लागू करण्यात आले याची माहीती पुढील प्रमाणे.

शक्यतो कायद्यांचा उपयोग करायची वेळ कुणावर येऊ नये, ही इच्छा आहे.

## (उ) कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा, 2005

भारतातही स्त्रीला कौटुंबिक हिंसाचारापासून सुटका मिळण्यासाठी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा 2005 करण्यात आला आहेत.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने 2005 मध्ये अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर 2006 पासून तसा कायदा संपूर्ण देशभर लागू झाला. या कायद्यांमुळे महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देण्यात आले.

स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळ्या अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजपर्यंत खाली दिले गेलेले कायदे अस्तित्वात आहेत.

अ) भारतीय दंड विधान कायदा 1860
आ) हुंडा प्रतिबंधक कायदा, 1961
इ) सती प्रथा विरोधक कायदा, 1987
ई) स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा 1986
उ) घटस्फोट कायदा, 1869
ऊ) कुटुंब न्यायालय कायदा, 1984

ओ) मुस्लिम महिलांसाठी कायदा, 1986
औ) गर्भलिंग परीक्षण व गर्भपात विषयक कायदा.

अशा प्रकारच्या निरनिराळ्या कायद्यांअंतर्गत स्त्रियांना मिळणारे हक्क किंवा संरक्षण आणखीन प्रभावीपणे लागू होण्यासाठी हा नविन 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा 2005' निर्माण झाला कौटुंबिक हिंसा ही घरात घडते. ज्याला आपण सर्व आपल्या सर्वांचे सर्वात सुरक्षित स्थळ समजतो. आजपर्यंत बरेच स्त्री अत्याचारविषयक कायदे निर्माण झाले. परंतु घराच्या चार भिंतीआड होणारा हिंसाचार आजवर उपेक्षितच होता. ज्या महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्या आहेत. त्यांना त्यांच्या अधिकाराचा वापर सहज शक्य होण्यासाठी व त्यांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे.

# प्रकरण दुसरे

## अध्ययन पद्धती व पूर्वसाहित्याच्या अभ्यास

### प्रस्तावना

कोणत्याही विषयाच्या अभ्यास करावयाच्या असेल तर त्या आधी विषयाची व्यवस्थित मांडणी करणे आवश्यक आहेत. तसेच अध्ययनाकरिता एका विशिष्ट पद्धतीची आवश्यकता असते. वरील प्रमाणे बाबीकडे दुर्लक्ष करून अध्ययन केले तर त्या विषयाला दिशा राहणार नाही. त्यामूळे त्याची व्यवस्थित मांडणीही करता येणार नाही त्यामूळे ते निरर्थक ठरे

"सद्य स्थितीतील भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय अध्ययनाकरिता निवडला आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी ज्या पद्धतीच्या वापर केला त्याची चर्चा पुढीलप्रमाणे

### विषयाची निवड

गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत निरनिराळे अभ्यासक्रम चालविले जातात स अभ्यासक्रम समाजशास्त्र पारंगत असाच्या एक अभ्यासक्रम अनेक विद्य अभ्यासक्रमा प्रमाणे चालविला जातो. या अभ्यासक्रमात

समाजशास्त्र पारंगत भाग (T.Y.) 3rd year च्या विद्यार्थ्यांना प्रकल्प अहवाल सादर करायचा असतो. त्या दृष्टीने माझे मार्गदर्शक यांच्याशी मी चर्चा केली. त्यानंतर "सद्य स्थितीतील भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय निवडण्यात आला.

हा विषय अन्य विषयापैकी या विषयासंबंधी मला उत्सुकता निर्माण झाली व सराशी चर्चा करुन शेवटी "सद्य स्थितील भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयावर मी अध्ययन करण्याचे ठरविले.

## उद्देश

कोणत्याही प्रकारच्या अध्ययनाला विशिष्ट दिशा प्राप्त व्हावी म्हणून उद्देश निश्चित करणे आवश्यक असते.
कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या, अर्थ व कारणे जाणून घेणे.
कौटुंबिक हिंसाचार समस्येचे स्वरुप जाणून घेणे.
कौटुंबिक हिंसाचार समस्येचे परिणाम जाणून घेणे.
कौटुंबिक हिंसाचार समस्येमुळे मानवी जीवनावर पडलेला प्रभाव किंवा परिणाम जाणून घेणे.
कौटुंबिक हिंसाचार समस्येवरील उपाययोजना सुचविणे.

वरील पैकी उद्देश पुर्तीसाठी अध्ययन हाती घेतले आहेत.

# "अध्ययनाचे क्षेत्र"

" सराव किंवा अनुभव यांच्याद्वारे वर्तनात घडून येणारे सापेक्षतः टिकाऊ स्वरुपाचे बदल म्हणजे अध्ययन होय" या वरून लक्षात लक्षात येईल की अध्ययनामुळे वर्तनात सुधारात्मक बदल होत असतात. अध्ययनाचे घडणारे बदल हे टिकाऊ स्वरुपाचे असतात.

अध्ययन क्षेत्र हे सामाजिक समस्येच्या बाबतीत विशालमय असते. संपूर्ण क्षेत्राचे अध्ययन करणे अशक्य असल्यामुळे अध्ययनाकरिता क्षेत्र निश्चित करावे लागते.

या प्रकल्प अहवालामध्ये खालील कौटुंबिक हिंसाचार समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यासाठी स्वरुप जाणून घेण्यासाठी अध्ययन केले जात आहे.

कोणत्याही विषयाचे अध्ययन करतांना समुहाचे अध्ययन करणे आवश्यक असते. त्यामुळे त्या समुदायातील काही सदस्य हे नमुना म्हणून निवडतात. हा नमुना संपूर्ण समग्राच्या प्रतिनिधीक स्वरुपात असते. माझ्या अध्ययनाकरिता मी द्वितीय तंत्र पद्धतीचा वापर केला आहे.

या नमुना निवड प्रकारात संशोधक द्वितीय तंत्र पद्धतीच्या वापर करीत असतो. ही माहिती संशोधक स्वतः संशोधन करून नाही तर प्रकाशित पुस्तकाच्या माध्यमातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून माहिती घेऊन संशोधक संशोधन करत असतो.

मुक्त प्रकाशित पुस्तकातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून काढली जाणारी माहिती किती प्रमाणात सत्य आहे व ती माहिती कोणत्या स्वरूपात मांडलेली आहेत यांची संशोधकाला सर्वात आधी पडताळणी करणे आवश्यक आहेत. संशोधक संशोधन करताना माहिती कोणत्या प्रकारे मांडायची आहेत. यांचे प्रयोजन करीत असते.

## तथ्य संकलन आणि तंत्रे

तथ्य संकलन हा संशोधन कार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तथ्य संकलनाशिवाय शास्त्रीय संशोधनाचे कार्य पुढे जाऊ शकत नाहीत. संशोधनाची उद्दिष्टेपूर्ण करण्यासाठी विशिष्ट घटनेच्या किंवा समस्येच्या बाबतीत सत्य शोधून काढणे त्या घटनेची संबंधित असलेली वास्तविक माहिती (तथ्य) संकलन करणे आवश्यक असते.

"तथ्य हे एक अनुभवासिद्ध सत्य पनिय निरीक्षण आहे"

## ॲन्थोनी गिडीन्स : यांच्या मते,

"कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एका किंवा अनेक सदस्यांच्या विरोधात केलेले शारीरिक दुरुपयोग म्हणजे कौटुंबिक हिंसाचार" होय.

तथ्य संकलनाचे प्रमुख चार स्त्रोत आहे. स्त्रोतांपैकी तथ्य संकलनासाठी मुलाखत या आधारे तथ्य संकलन करण्यात आले.

## तथ्य प्रक्रिया

संशोधनात तथ्य मिळण्याची एक प्रसिद्ध रीत म्हणून दुय्यम सामग्रीचा उल्लेख करता येईल. प्राथमिक स्त्रोतांपेक्षा दुय्यम स्त्रोतांच्या वापरही मोठ्या प्रमाणात केल्या जातो. ही माहिती गोळा केल्या नंतर ही माहिती तपासण्यात आली नंतर माहितीच्या योग्यतेप्रमाणे नोंदणी केल्या गेला.

## सारणीकरण

एका उत्तरदात्याने दिलेल्या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचे एका दृष्टीकोनातून ज्ञान व्हावे म्हणून

सारणी तयार करण्यात आली आहे. सारणीद्वारे तथ्यांना वर्गीकरणानंतर तथ्यांशी अशा तऱ्हेने व्यवस्थित मांडणी तयार करण्यात येते. अर्थ आणि महत्त्व स्पष्ट होतो.

प्रामुख्याने सारणी या दोन प्रकारच्या असते.
(1) साधी सारणी
(2) द्विगुणी सारणी

या अध्ययनामध्ये मी साध्या सारणीच्या उपयोग केला आहेत.

## सारणी विश्लेषण

नवनवीन शोधशोध घेणे नवनिर्माण संकल्पना शोधून काढणे जुने नियम, संकल्पना यांना पुनः परिक्षण करणे हा सामाजिक संशोधनाच्या उद्देश आहे.

सारणीमुळे आपण आपली माहिती विशिष्ट स्वरूपात मांडू शकतो व त्याचे विश्लेषण देखिल करू शकतो. सारणी काय दर्शविते. त्या सारणीवरुन कशाची माहिती स्पष्ट करायची आहे. हे त्या सारणीचे विश्लेषण करायचे आहेत. सारणीमध्ये माहिती पूर्व प्रस्तावना देण्यात आली आहे. त्यामध्ये योग्य शिर्षक व क्रमांक दिले गेले आहेत.

## आलेख

प्रकल्प अहवालामध्ये आलेख हा महत्वपूर्ण भाग आहे. प्रकल्प अहवाल आकर्षक देखणा व माहितीपूर्ण व्हावा म्हणून या दृष्टीने आवश्यक तेथे आलेख काढून सारणीचे विश्लेषण करण्यात आले आहेत.

## प्रकरणीकरण

संकलीत झालेली माहिती ही सोपी व हाताळण्यास सोपी जावी या उद्देशाने प्रकरणामध्ये विभागले गेले आहे ते पुढील प्रमाणे:
प्रकरण पहिले
प्रकरण दुसरे
प्रकरण - निष्कर्ष, सूचना व उपकल्पनाचे परिक्षण
परिशिष्ट- अ) संदर्भ ग्रंथ सुची

## अध्ययनाच्या मर्यादा

या प्रकल्प अहवालामध्ये अध्ययनाची मर्यादा ही हिसाच्यारापुरतीच मर्यादित राहील अध्ययनाचा विषय विस्तृत असल्यामुळे सखोल अभ्यास करणे अवघड आहे. अध्ययनाचे निष्कर्ष सर्व ठिकाणच्या परिस्थितीला लागू पडतील असे नाहील.

## संशोधन अध्ययनात आलेल्या अडचणी

कोणत्याही प्रकारचे अध्ययन करताना अनेक अडचणी येतात. अडचणीतून मार्ग काढत संशोधकाला काम/कार्य पुर्ण करावे लागतात. माझ्या प्रकल्प अहवालात थोड्या प्रमाणात पुरेसे साहित्य अध्ययन करीत असताना अनेक प्रकारचे प्रयत्न करावे लागते. प्रत्येकाच्या विविध प्रश्नांना समोरे जावे लागत होते. अशा अनेक अडचणींना तोंड देऊन प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले अध्ययन पद्धतीच्या आधारे प्रकल्प लेखनाचे कार्य करण्यात आले कौटुंबिक हिंसाचाराला सहाय्य करणारे घटक आणि मानवी जीवनावर होणारे परिणाम अभ्यासण्यात आले आहे.

## निष्कर्ष व निर्वचन

"सद्य स्थितीतील भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाच्या प्रत्यक्ष अभ्यास करीत असताना तथ्यांच्या विश्लेषणानंतर अध्ययन पद्धतीची महत्त्वाची पायरी म्हणजे निष्कर्ष व निर्वचन होय. या पद्धतीचा माझ्या प्रकल्प अध्ययनात अंतर्भाव करण्यात आले. प्राप्त झालेल्या निष्कर्षांची पडताळणी असते त्या आधारे या पुढील नव्या संशोधनाची दिशा ठरवण्यास उपयोग होतो.

## अहवाल

संशोधन पद्धतीमधील अहवाल ही संशोधनाची शेवटची पायरी आहे. सद्य स्थितीनिमित्त "भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" ह्या माझ्या प्रकल्प लेखनाच्या उद्देश असून विद्यापीठ पातळीवरील उच्चशिक्षण प्रकल्प लेखन करणे अनिवार्य ठरविण्यात आली आहे.

या करिता मी माझ्या प्रकल्प अहवाल विद्यापीठास सादर करीत आहे.

तथ्यांचे विश्लेषण करुन निष्कर्षावर आधारित या अहवालातील उपाययोजना विद्यापीठाने आणि शासनाने दखल घेतल्यास या सर्व सूचनांची अंमलबजावणी केल्या भारतातील कौटुंबिक हिंसेच्या समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन" या वरील लेखन केले जात आहे.

# व्याख्या

## कौटुंबिक हिंसाचाराची अर्थ व व्याख्या

### मेरिअम - वेबस्टर

"कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या सदस्यास दुखापत करणे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय. असा वर्तनप्रकार वारंवार व सराईतपणे करणे होय."

### ॲन्थोनी गिडीन्स

"कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एक किंवा अनेक सदस्यांच्या विरोधात केलेला शारिरीक दुरुपयोग म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय.

- कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकवणे, त्रास देणे, दुखापत करणे,

जखमी करणे किंवा पीडित महिलेच्या जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाइकांकडे हुंड्याची मागणी करणे व या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाइकांवर होणे तसेच आर्थिक छळ म्हणजे महिलांचे स्वतःचे उत्पन्न स्त्रीधन, मालमत्ता, किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्ते-तून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते.

## प्रकरण दुसरे (ब)

कौटुंबिक हिंसाचारच्या वैशिष्ट्ये पाहत असताना त्यात दोन भाग प्रामुख्याने केले आहेत.

प्रमुख वैशिष्ट्ये

सर्वसाधारण वैशिष्ट्ये

### प्रमुख वैशिष्ट्ये

भारतात सर्वत्र्य घरगुती हिंसाचार ही सर्वसाधारण बाब समजली जाते.

कौटुंबिक हिंसाचारास जबाबदार असणारी दिर्घकाळापासून दूर झालेली हुंडा प्रथा आहे.

लहान मुले स्त्रिया व वृद्ध ही व्यक्ती जास्त प्रमाणात कौटुंबिक हिंसेला बळी पडतात.

भारतामध्ये व इतर देशातही कौटुंबिक हिंसाचारास प्रामुख्याने स्त्रियाच बळी पडत असतात.

आई वडिलांच्या घरी मुलींना मिळणारी वोदकाय पूर्ण वागणूक वा हक्क हा त्यांचा अधिकार मानला जातो.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 हा कायदा तयार करण्यात आला आहे.

# सर्वसाधारण वैशिष्ट्ये

## कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत महिलांचे संरक्षण

कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कोणती महिला कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण मागू शकते हे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रकाश हरात पत्नी अथवा अन्य नाते संबंधाने एकत्र राहणाऱ्या महिला लग्न अथवा लिव्हइन रिलेशनशिप मध्ये असणारी महिला, नवऱ्याविरुद्ध अथवा संबंधित पुरुषाविरुद्ध संरक्षण मागू शकते.

## कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत महिलेला आर्थिक सहाय्य

सर्वात महत्त्वाचे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत पीडित महिलेला तिच्या पतीकडून आर्थिक सहाय्य आदेश (दैनंदिन देखभाल खर्च) न्यायदंडाधिकारी देत असल्यामुळे आर्थिक लाभापासून तिला वंचित ठेवता येत नाही. तिचे स्त्रीधन तिलाच मिळते पण त्या शिवाय तिला किंवा तिच्या वतीने न्याय मागणाऱ्या व्यक्तीला दैनंदिन खर्चाच्या पूर्तीसाठी शारीरिक मानसिक हानीच्या नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायदंडाधिकारी देतात.

## कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत मदत

पीडित महिलेस वैयक्तिक सुविधा, कायद्याविषयक मदत, वैद्यकीय मदत, मनोसोपचार तज्ज्ञांच्या सेवा, सुरक्षित आश्रय इ. गोष्टी संरक्षण अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्या संस्थेमार्फत दिल्या जातात.

## कायद्यातील विशेष तरतूदी

या कायद्यातील तरतुदीमुळे स्त्रियांना घरातून बाहेर काढता येत नाही. तसे केल्यास त्यांना राहण्यासाठी संबंधितांस पर्यायी व्यवस्था करावी लागते. छळ करणाऱ्याला घरात किंवा पीडित महिलेच्या कामाच्या ठिकाणी जाण्यास मज्जाव केला जातो. तिच्याशी संपर्क साधण्याला मनाई केली जाते.

## कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या अंमलबजावणी

कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक राज्याने संरक्षण अधिकारी (Protection officers) आणि सेवा पुरविणाऱ्या संस्था (Service Providers) नियुक्त करायात अशी अशी तरतुद कायद्यात आहेत. त्या प्रमाणे महाराष्ट्र शासनानेही संरक्षण अधिकारी व सेवा देणाऱ्या संस्थांची नियुक्ती केली आहे.

## ६) कौटुंबिक हिंसाचार समस्येवर नियंत्रण

महिलेच्या प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ तसेच शारीरिक, लैंगिक छळ, टोमणे मारणे, मानसिक आणि आर्थिक छळ तसेच हुंड्याची मागणी त्यासाठी बायकोच्या किंवा किंवा तिच्या नातेवाईकांच्या छळ या बाबीनी कौटुंबिक हिंसाचार म्हणले जाते. ही एक फार मोठी समस्या आहे. विशेष करुन स्त्रियांना त्यांवर तोंड द्यावे लागते.

# कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप

कौटुंबिक हिंसाचाराची व्यापकता समजून घेण्यासाठी भारतात कौटुंबिक हिंसाचाराच्या घडणाऱ्या घटनांची माहिती होणे आवश्यक ठरेल.

1) नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्युरोच्या (NCRB) च्या अहवालानुसार 1984 ते 2001 या कालावधी पर्यंत 49170 एवढ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली.

2) 2005 च्या नोंदीनुसार कौटुंबिक छळा-मुळे दररोज 66 स्त्रिया आत्महत्या करतात. दररोज 5 महिलांचा पाण्यात बुडून मृत्यू होतो. कौटुंबिक हिंसाचारामुळे दररोज 57 स्त्रिया विषारी औषध पिऊन आत्महत्या करतात. तर दररोज 35 महिलांचा भाजून मृत्यू होतो. या मध्ये काही वेळा विषारी औषध पाजून वा स्त्रियांना जाळून मारले जाते. स्त्रीच्या पतीच्या मृत्यूनंतर तिचे केशवपन केले जाते व तिला वेगवेगळ्या प्रकारचे दुःख सहन करावे लागते.

3) 2005 च्या दरम्यान स्त्रियांवरील हिंसेमध्ये प्रचंडी वाढ झाली की नॅशनल कमिशन फॉर वूमन ने त्यांचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक देऊन सामाजिक व राष्ट्रीय स्तरावरमध्ये हिंसेला बळी पडणाऱ्यासाठी हेल्पलाइन सेवा उपलब्ध असल्याची जाहिरात केली.

4) 2005 च्या राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षणानुसार 56% स्त्रियांना हिंसा सर्वसामान्य बाब वाटते. कुटुंबामध्ये जवळच्या व्यक्तींना वा नाते लागांकडून स्त्रियांवर विविध प्रकारचे अत्याचार होत असतात. आणि तो त्यांचा अधिकार आहे. असे समजले जाते. स्त्रियांनाही हिंसा स्वाभाविक वर्तणूक वाटते. परंतु कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांच्या आढावा घेतल्यास त्यामधील गांभिर्य लक्षात येते. स्त्रियांवरील हिंसेमध्ये कोणकोणत्या कृत्यांचा समावेश होतो. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

भगवती

## शारीरिक हिंसा

या प्रकारामध्ये स्त्रीचा शारिरीक छळ केला जातो. बळाचा वापर करुन स्त्रीच्या अवयवांना इजा पोहचेल असे कृत्य केले जाते. मारहाण, चावणे, चटके देणे, शॉक देणे, ढकलून देणे, शोबाडीत मारणे, लाथ मारणे, केसांना धरुन ओढणे, हाताला येइल त्या वस्तूने जीव घेणे, वार करणे, दात पाडणे, कान कापने, भिंतीवर डोके आपटणे, या शिवाय नैसर्गिक गरजा पूर्ण करण्यात अडथळे आणणे, उपाशी ठेवणे झोपू न देणे आजारपणा कडे दुर्लक्ष करणे.

## मानसिक हिंसा

स्त्रियांवर होणारी मानसिक हिंसा प्रत्यक्षात दिसून येत नाही. पण त्याचे अत्यंत प्रतिकूल परिणाम स्त्रियांच्या मानसिकतेवर होतात. अपमानास्पद वागणूक, टोम टोमणे मारणे, धमकी देणे, सतत दडपणाखाली ठेवणे, दिसण्या विरुद्ध उपहासाने बोलणे, चारित्र्याचा संशय घेणे कोंडून ठेवणे, कोणास भेटू न देणे, कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य आणि अधिकारापासून वंचित ठेवणे.

3) लैंगीक हिंसा

लैंगिक अत्याचारामुळे स्त्रीच्या आत्मसन्मानास धक्का पोहचतो. पती दिर, सासरे, इतर पुरुष नातेवाईक व्यक्ती स्त्रीचा विनयभंग करतात. तिच्या बरोबर जबरदस्तीने संबंध ठेवतात. अश्लिल चाळे केले जातात. तिचा विभित्स, अनैतिक, कृत्य करावयास भाग पाडले जाते. काही वेळा पुरुषांशी शारिरीक संबंध ठेवावयास भाग पाडले जातात. काही वेळा वेश्याव्यवसायासाठी जबरदस्ती केली जाते. या कृत्यांचा समावेश लैंगिक छळामध्ये होतो.

4) आर्थिक हिंसा

स्त्रीला आर्थिक दृष्ट्या परावलंबी करणे, जरी स्त्री संपत्ती धन असते तरी त्यावर स्त्रीचा अधिकार नसतो. तिच्या कडून स्त्रीधन काढून घेतले जाते. स्त्री कमावती असली तर तिचा पगार काढून घेतला जातो. प्रवेळेच्या नाही तर तिला तिच्या अन्न, वस्त्र, औषधोउपचार अशा गरजेसाठीही पैसे दिले जात नाही स्त्रीचा हुंडा व इतर वस्तूंच्या मागणीसाठी दबाव टाकणे या प्रकाराची कृत्य म्हणजे आर्थिक हिंसा.

कमवती

एक जबाबदार लोकशाही देश म्हणून स्त्रीला समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कुचराई होत असेल तर आपल्या न्याय व्यवस्थेकडे दाद मागण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहेत. आणि त्यांचा उपयोग आहे. अनेकदा महिलांनाच माहित नसते शक्यतो कायद्याची वेळ कुणावर येऊ नये, ही इच्छा आहे. मात्र वेळ पडलीच तर महिलांना या ही आघाडीवर आपण सक्षम आणि निर्भय आहोत. हे दाखवून द्यावे हाच हेतू आहे. "कौटुंबिक हिंसाचार : महिलांचे संरक्षण कायदा 2005 या कायद्याचा सविस्तर परिचय करून देण्यात आला आहे. तो आपल्याला उपयुक्त वाटेल अशी आशा करते.

# प्रकरण तिसरे

## कौटुंबिक हिंसाचाराच्या समस्येची कारणे

### कौटुंबिक हिंसाचाराची कारणे

भारतीय समाजव्यवस्थेत महत्वाचे कौटुंबिक हिंसाचार वाढण्याचे काही कारणे आहेत. ते अभ्यासणे निश्चितच महत्त्वाचे आहेत त्यापैकी काही प्रमुख कारणे पुढील प्रमाणे..

### पितृसत्ताक कुटुंब पद्धती

पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत पुरुषांच्या हाती सत्ता एकवटलेली असते. कुटुंबातील नियंत्रण व निर्णयांचे अधिकार पुरुषाकडे केंद्रित असतात. अमर्याद व्यक्तीच्या हुकुमशाही प्रवृत्तीस पोषक ठरते. म्हणूनच बहुसंख्यवेळा पुरुष आपल्या कुटुंबातील सदस्यावर विशेषत: स्त्रिया व लहान मुलांवर अत्याचार करतो. पुरुष हा मालक व स्त्री ही दासी मानणाऱ्या व्यवस्थेने स्त्रीला पुरुषाची मालमत्ता मानले.

प्रामुख्याने पितृसत्ताक पद्धतीत पित्याच्या म्हणजेच वडिलांच्या हातात कारभार असतो.

## स्त्री ची मानसिक दुर्बलता व परावलंबन

मध्ययुगीन काळापासून स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल व मूल हेच मानले गेले. तिला शिक्षण व अर्थार्जनाच्या संधी नाकारल्या गेल्या. परावलंबन स्त्रीला अधिक दुबळ बनवते. व पुरुषांमधील वर्चस्ववाद, एकाधिकारशाही प्रबळ करते. स्त्री पुरुष भेदभावासाठी श्रम विभाजन कारणीभूत ठरल स्त्रीला पुरुषाची दासी मानल्या जाऊ लागले. एकूणच स्त्रीची दुर्बलता व पुरुषाची प्रबळ स्वामीत्व, भावना स्त्रियांवरील अत्याचारास पोषक ठरली.

## मानसिक विकृती व व्यसनाधिनता

काही पुरुषांमध्ये आक्रमक, हिंसक, वर्चस्ववादी, दुसऱ्यावर हुकुमत गाजवणारी प्रवृत्ती असते. असे पुरुष कुटुंबातील सदस्याशी नेहमी हिंसक वर्तन करतात. अशा विकृत मानसिकतेचे पुरुष घराबाहेरील अपयश, अपमान, ताणतणावाचा राग घरातील बायकावर, मुलांवर मारहाण करून काढतात.

तसेच मद्यपान, मादक द्रव्याचे सेवन करणाऱ्या पुरुषांमध्येही बायको आणि मुलांना मारहाण करण्याचे प्रमाण अधिक आहेत.

## संशयीवृत्ती

स्त्री चंचल, ओढाळ, नादाळ चारित्र्यहीन असते असे प्रवाद समाजात पूर्वी पासून रुजले असलेल्या समाजात स्त्री च्या चारित्र्याकडे अत्यंत काटेकोरपणे पाहिले जाते. बऱ्याच वेळा पुरुष स्त्रीच्या चारित्र्यावरुन संशय घेऊन तिच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली जाते. ही एक प्रकारची हिंसाच आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या साध्या सरळ जीवन जगण्यावर एक प्रकारे सातत्याने दडपण आणले जात असते. संशयी पुरुष स्त्रीला मारहाणही करतो. संशयामुळे पत्नीला जीवे मारण्याच्या कित्येक घटना घडताना दिसून येतात. काही पुरुष स्त्रीला संशयावरुन कोंडून घालतात.

## स्त्री अपत्यप्राप्ती व पुत्रप्राप्तीचे साधन

पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला व्यक्तीगत संपत्ती वंशवृद्धीचे साधन मानले जाते. स्त्रीची गरज स्त्रिच्या गर्भाशयासाठी या मानसिकतेतून स्त्री ला जर मुल होत नसतील तर सारेच दोष स्त्रीलाच देऊन तीचा अमानुष छळ केला जातो. त्या शिवाय मुख्यादृत्या स्त्रीला फक्त मुलीच होत असतील तर

त्याचा दोषही स्त्रीच्या माथी मारून तिचा शारीरिक, मानसिक छळ केला जातो. असा छळ पती व इतर नातेवाइकांकडून होत असतो.

## हुंडाप्रथा

विवाह हा स्त्रीसाठी अत्यंत महत्त्वाचा व आवश्यक संस्कार मानला जातो. त्यातूनच हुंडाप्रथा निर्माण झाली. विवाह प्रसंगी वधूपक्षाने हुंडा व मानपान देणे आवश्यक मानले जाऊ लागले. विवाहानंतर लोभी पती व त्यांच्या नातेवाइकांची हुंडा व सतत भेट वस्तू मागणी वाढतच जाते. अशी मागणी न पुरवल्यास स्त्री चा छळ होतो. हुंड्यासाठी मारहाण केल्याच्या, ठार मारल्याच्या जाळून मारल्याच्या व स्त्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कित्येक घटना घडताना दिसून येतात. हुंडा विरोधी कायदा करण्यात आला असूनही आजही कित्येक नवविवाहित हुंडा प्रथेमुळे कौटुंबिक हिंसाचारास बळी पडतात.

## स्त्रीच्या जोडीदार निवडीवर निर्बंध

आजही पूर्वापार चालत आलेल्या प्रथा परंपरांचे पालन करणे स्त्रीसाठी आवश्यक मानले जाते. त्यामुळे मुलीने स्वमर्जीने विवाह ठरविणे, प्रेमविवाहाचा आग्रह धरणे, जाती बाह्य विवाह करणे, हे कुटुंबाच्या प्रतिष्ठेस बाधा पोहचवणारी बाब मानली जाते.

असा आग्रह धरणाऱ्या मुलीस कुटुंब व नातेवाईकांच्या रोषास बळी पडावे लागते. त्यातून मुलींच्या छळ करतात. काही वेळा कनिष्ठ जातीतील तरुणाशी प्रेमसंबंध असल्यास वा त्यांनी विवाह केल्यास दोघांचीही हत्या केल्याच्या कित्येक घटना दिसून येते. अशा प्रतिष्ठेसाठी बळी (Honour Kiling) वाढत जाणाऱ्या गंभीर समस्या बनली आहेत.

## कौटुंबिक हिंसाचाराचे परिणाम जाणून घेणे

कौटुंबिक हिंसाचाराचा समाजावर होणारा परिणाम खालील प्रमाणे पाहता येईल.

### पितृसत्ताक नियंत्रण

भारतीय स्त्रीयांच्या सर्व समस्यांचे मूळ पितृप्रधान संस्कृतीत आहेत. समाजामध्ये पुरुषांचा दर्जा हा महिलेपेक्षा उच्च समजला जातो. आणि महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो. लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी नैसर्गिक मानली जाते. स्त्रियांच्या हातात संपत्तीचा अधिकार नसतो तर घरातील सर्व संपत्तीचा अधिकार पुरुषाकडे असतो. पितृसत्ताक नियंत्रण टिकवून ठेवण्यासाठी हिंसा होते असे साधारण पणे दिसते.

### स्त्रियांचा दुय्यम दर्जा

पत्नीचा दर्जा हा दुय्यम समजला जातो. पत्नी ऐकत नसेल, चुका करत असेल तर नवरा मारणारच. असे हिंसेचे समर्थनही होते. मात्र पत्नीने नवऱ्याचे सगळे ऐकलेच पाहिजे. ही पुन्हा पितृसत्ताक मानसिकता आहे. आधुनिक कायदाव्यवस्था हिंसा करण्याचे अधिकार कुणालाच देत नाही. उलट कोणत्याही प्रकारची हिंसा म्हणजे पिडितेच्या हक्कांचे उल्लंघन आहेत. असे कायदा म्हणतो.

## 3) कुटुंबातील महिलांवर होणारे हिंसाचार

भारतात महिलांवर होणारे हिंसाचार हे नविन राहिलेले नाही. आपण रोज वर्तमानपत्रात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या वाचत असतो. महिलांवर होणारे अत्याचार हे वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. त्यात प्रामुख्याने कुटुंबात होणारे अत्याचार हे कौटुंबिक हिंसाचारामध्ये येतात. पुर्वी हुंड्याच्या नावाखाली मुलींना होणारी शारीरिक मारहाण आणि त्या अनुषंगाने होणारे अत्याचार इथपर्यंत कुटुंबात होणाऱ्या हिंसेकडे पाहिले जायचे. परंतु स्त्री वादी सामाजिक कार्यकर्त्या आणि महिला संघटना यांनी सातत्याने केलेल्या संघर्षामुळे 2005 साली केंद्र सरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा बनविला.

## 4) स्त्रियांवर नोकरी करण्यास बंधन

घरातल्या बाईने काय करायचे, बाहेरचे काम कुठे / कसे यावर पतीचे / घरच्यांचे नियंत्रण असते. तिला तिच्या जीवनाचे निर्णय सुद्धा घेण्याचे सामर्थ्य नसते. तिला नोकरी देखील करू दिली जात नाही. स्मार्टफोन वापरावरून अनेकदा स्त्रियांना विविधाळ मारहाण होते.

## कौटुंबिक हिंसाचारामुळे मुलांच्या वर्तणूकीत बदल

कौटुंबिक हिंसाचाराच्या मुलांच्या वर्तणूकीत देखिल बदल होत असते. मुलांचे अधिकार लिहाात होता या हिंसाचारामुळे मुलांच्या अधिकाराचे उल्लंघन होताना दिसते, त्यामुळे घरात होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या मुलांच्या प्रकृतच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक वर्तणूकीत बदल होतात. अधिकांश मुले ही घरात होणाऱ्या हिंसाचारच्या घटनेत हस्तक्षेप करतात.

## शिक्षित संपन्न वरास प्राधान्य

भारतात आज ही मुलींना नाममात्र शिकण्याची संधी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यास नकार देणारे पालक मुलीसाठी मात्र उच्च शिक्षित श्रीमंत वर मिळावा ही अपेक्षा करतात त्यासाठी कीतीहि हुंड्याची देण्याची तयारी असते त्यामुळे अशा श्रीमंत शिकलेल्या वरांकडून अधिक हुंड्याची मागणी होऊ लागते.

## मानसिक हिंसा

स्त्रियांपर होणारी मानसिक हिंसा प्रत्यक्षात दिसून येत नाही. पण त्याचे अत्यंत प्रतिकूल परिणाम स्त्रियांच्या मानसिकतेवर होतात. अपमानास्पद वागणूक, टोमणे मारणे, धमकी देणे, सतत दडपणाखाली ठेवणे, दिसण्यावरून उपहासाने बोलणे, चारित्र्याच्या

संशय घेणे, कोंडून ठेवणे, कोणास भेटू न देणे, कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य अधिकारापासून वंचित ठेवणे इ..

8) आर्थिक परिणाम

हातातले पैसे जाणे, नोकरी जाणे, काही दिवस त्या स्त्रीने काम केलेले असते. नवरा नंतर कामावर जाऊ देत नाही. ह्यामुळे, जितके दिवस काम केले त्याचे पैसेही मिळत नाही आणि तीची कामावरची सिक्युरिटीही जाते. कामावर सातत्य नाही म्हणून तिच्यावरचा उ विश्वास उडतो आणि पुढे ती त्या कामातली कितीही तज्ञ असली तरी तिला ते काम मिळत नाही.

# प्रकरण चौथे
## तथ्य संकलन व विश्लेषण
### द्वितीयक तंत्र

मी या प्रकल्पा मध्ये द्वितीय तंत्र पद्धतीने माहिती मिळवलेली आहे. द्वितीयक तंत्र म्हणजे दुय्यम स्वरूपाची माहिती गोळा करून आणि त्या माहितीची पडताळणी करून लिहीलेली आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती म्हणजे पुस्तकांन मार्फत, वाचनालयाला भेट देऊन व इंटरनेट मार्फत काढून ही माहिती मिळवलेली आहे.

विविध प्रकारची पुस्तके गोळा करून लिहीली आहे. आम्ही एकण पुस्तके ४-५ हाताळली आहे. तसेच त्या पुस्तकांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येइल.

कौटुंबिक हिंसाचाराशपासून महिला संरक्षण कायदा 2005

हिंसामुक्त जीवन

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण व अधिनियम 2005 व नियम 2006

लिंगभाव आणि हिंसाचार

असे पुस्तके मी हाताळली आहे. व विविध स्वरूपातून विविध वेबसाईड, वरून विविध वाचनालयाला भेट देऊन व इंटरनेटच्या मदतीने

मी ही माहिती मिळवलेली आहेत.

या प्रकल्पामध्ये मला सरांनी योग्य मार्गदर्शन केले आहे व कसे लिहायचे व कसा आराखडा तयार करायचा याची विस्तृत माहिती सरांनी मला दिली या प्रकल्पामध्ये मी प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा न करता आणि व्दितीयक तंत्राची माहिती गोळा केली आहेत. दुय्यम स्वरूपामध्ये मी ज्या पुस्तकाची माहिती गोळा केली आहे. त्या पुस्तकाच्या आधारे ही माहिती लिहली आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती लिहलेली आहेत.

## कौटुंबिक हिंसाचारात राज्यात वाढ; ग्रामीण भागात महिलांचा छळ अधिक

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांना अजूनही कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत असून, गेल्या पाच वर्षांत तक्रारींमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहेत. शहरापेक्षा ग्रामीण भागात महिलांचा अधिक छळ होत असतानाच दुसरीकडे, कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत आहेत.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या यंदाच्या (2019-20) अहवालात राज्यातील विदारक स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. राज्यातील 31 हजार 643 कुटुंबातील 33 हजार 755 महिलांसह 5497 पुरुषांकडून ही माहिती संकलीत करण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहे. राज्यामध्ये 18 वर्षांखालील मुलींच्या विवाह होण्याच्या घटनाही अहवालात अधोरेखित झाल्या आहेत. 18 ते 49 या वयोगटातील महिलांच्या पुरुषांकडून अत्याचार आणि छळ होत असल्यामुळे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

2005 - 06 मध्ये राज्यात या छळाचे प्रमाण 21.3 टक्के होते.
2019 - 20 मध्ये वाढ होऊन हे प्रमाण 25.3 टक्क्यावर पोहोचले.
शहर आणि ग्रामीण भागातील महिलांच्या छळाचे प्रमाण अनुक्रम 21 टक्के आणि 28.6 टक्के आहेत.

## सारणी क्रमांक 1

### कौटुंबिक हिंसेचे प्रमाण दर्शवणारी सारणी

| अ. क्र | महिलावर होणारे अत्याचार | वारंवारिता | टक्के |
|---|---|---|---|
| 1) | राज्यात छळाचे प्रमाण | 04 | 20% |
| 2) | शहरात छळाचे प्रमाण | 06 | 30% |
| 3) | ग्रामीण भागात छळाचे प्रमाण. | 10 | 50% |
| 4) | एकूण | 20 | 100% |

शहरापेक्षा ग्रामीण भागात महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण अधिक आहे. महिलांवरील मारहाणीचे प्रकारही वाढले आहेत. पाच वर्षांपूर्वी मारहाणीचे प्रमाण 2.9 टक्के होते. ते आता 3.3 टक्क्यांवर पोहोचले. 18 ते 24 या वयोगटातील तरुणींच्या लैंगिक अत्याचारांतही वाढ झाली आहे. पाच वर्षांपूर्वी 2.9 टक्क्यांवर असलेले लैंगिक अत्याचारांचे प्रमाण 2019-20 मध्ये 6.2 टक्क्यांवर पोहोचले. शहरात लैंगिक अत्याचारांचे प्रमाण साडेचार टक्के असून, ग्रामीण भागात ते 7.6 टक्के आहेत.

## सारणी क्रमांक २

शहरापेक्षा ग्रामीण भागात महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण दर्शविणारी सारणी

| अ.क्र | ग्रामीण भागातील हिंसेचेप्रमाण | वारंवारिता | टक्के |
|---|---|---|---|
| 1 | मारहाणीचे प्रमाण | 6 | 30% |
| 2 | लैंगिक अत्याचाराचे प्रमाण | 14 | 70% |
| | एकूण | 20 | 100% |

भगवती

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की. मारहाणीचे प्रमाण 30% तर लैंगीक अत्याचाराचे प्रमाण 70% आहेत. लैंगीक अत्याचाराचे प्रमाण हे. सर्वाधिक आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, कौटुंबिक हिंसाचारामुळे महिलांना अनेक प्रकारच्या हिंसेला बळी पडाव लागते. कौटुंबिक हिंसाचारास बळी पडणाऱ्या स्त्रिया यांच्यावर अत्याचाराचे प्रकार अनेक प्रकारचे आहेत. त्यामधूनच मारहाणीची प्रमाण हे कमी तर यापेक्षा लैंगीक अत्याचाराचे प्रमाण सर्वाधिक प्रमाणात आहेत.

भारतातील कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण हे. महिलांच्या बाबतीत सर्वाधीक प्रमाणात आढळून येते. नोकरीच्या ठिकाणी तिच्या वर लैंगीक शोषण केले जाते. आर्थिक शोषणाला पण तिला सहन करावे लागते. कुटुंब हे सर्वात सुरक्षित ठिकाण असून महिलेला तेथे असुरक्षितता भासु लागते. व कुटुंबातील पतीच्या. सासऱ्या च्या, दबावामुळे अनेक प्रकारच्या. दु:खापती, वेदना यांना तोंड द्यावे लागते.

## महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल

महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्राने नेहमीच पुढाकार घेतला आहे. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत विवाहित महिलांना संधी दिली जात असल्याचे दिसून आले आहेत. गेल्या वर्षी नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण २८.५ टक्क्यांवरून आता ३५.६ टक्क्यांवर पोहचले आहे. ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. मात्र, महिलांच्या नावावरील घर आणि जमीन घट झाली आहेत. स्वतःचे बँक खाते काढून वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या ७२.८ टक्के महिलांचे बँकेत खाते आहे

### सारणी क्रमांक ५

नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

| अ.क्र | नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गेल्या वर्षीचे प्रमाण | ५ | 20% |
| २ | या वर्षीचे प्रमाण | 16 | 80% |
| | एकूण | 20 | 100% |

भगवती

वरील सारणी वरून असे स्पष्ट होते की गेल्या वर्षीचे प्रमाण हे 20% आहेत आणि या वर्षीचे प्रमाण हे 80% आहेत. गेल्या वर्षीचे प्रमाण हे कमी आहे तर या वर्षीचे नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे सर्वाधिक जास्त आहे.

आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या महिला हे आपल्या आर्थिक बाबतीत चांगल्या प्रमाणे पाहिजे तेवढ्या पैसे खर्च करतात. आणि स्वतःची संपत्ती ते आपल्या मुला बाळांच्या योग्य शिक्षणासाठी लागते नियोजन केल्याप्रमाणे त्यांना पुरवितात.

नोकरी करण्याच्या ठिकाणी महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जसे की. पगार वेळेवर न मिळणे, सुट्टीच्या पण दिवशी काम करणे व इतर दिवशी सुट्टी ही न मिळणे, नोकरीच्या ठिकाणी, बस चे किंवा अन्य वाहने वेळात उपलब्ध न होणे, नोकरीचे तास वाढणे अशा अनेक प्रकारच्या संघर्ष महिलांना नोकरीच्या वेळी कराव्या लागतात.

## सारणी क्रमांक ५

### कौटुंबिक हिंसाचार निर्माण झाल्यास उत्तरदात्याची भूमिका दर्शवणारी सारणी

| अ.क्र | उत्तरदात्याची भूमिका | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रखर विरोध करणे | 6 | 30% |
| २) | समजवण्याचा प्रयत्न करणे | 2 | 10% |
| ३) | संघर्षात सहभाग घेणे | 4 | 20% |
| ४) | अलिप्त राहणे | 8 | 40% |
| | एकूण | 20 | 100% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की कौटुंबिक हिंसाचार निर्माण झाल्यास आपली भूमिका दर्शवणाऱ्या पैकी प्रखर विरोध करणे असे मत दर्शविणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण 30% एवढे आहे. तर संघर्ष निर्माण झाल्यास जमावास समजावण्याचे प्रयत्न करणे असे मत दर्शविणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण हे 10% असून संघर्षात सहभाग घेणे असे मत दर्शविणारे हे 20% एवढे आहे. तर अलिप्त राहणे असे मत दर्शविणाऱ्यांचे प्रमाण हे 40% एवढे आहेत.

यावरुन असे स्पष्ट होते की अलिप्त राहणे असे मत दर्शविणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तेव्हा असा निष्कर्ष निघतो की, कौटुंबिक हिंसाचार निर्माण झाल्यास बहुतांश लोक हे अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात.

आज भारतात अनेक प्रकारचे हिंसाचार पाहतो. कौटुंबिक हिंसाचार याला प्रामुख्याने महिला, वृद्ध, मुले, मुली यांच्यावर हिंसा केली जाते, महिलांना तर अनेक प्रकारच्या हिंसाचाराला तोंड द्यावे लागते. कुटुंब हे सुरक्षित ठिकाण म्हणून आपण कुटुंबाकडे पाहतो पण हेच ठिकाण काही वेळा याच ठिकाणी कौटुंबिक हिंसाचार आढळून येतो, जर एखाद्याच्या घरी एक मुलगा व एक मुलगी असेल तर त्या मध्ये भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते, मुलीला मुलाच्या तुलनेत कमी शिकवले जाते. अशा प्रकारचे अनेक कौटुंबिक हिंसाचार आज पाहायला मिळतात.

घराच्या चार भिंतीत स्त्रियांविरोधात होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण खूप अधिक आहे. कौटुंबिक हिंसाचार व्यापक स्तरावर प्रचलित आहे पण तो फारसा दिसून येत नाही. आकडेवारीतून दिसून येते की 45 टक्के भारतीय स्त्रियांना त्यांचे नवरे थोबाडीत मारतात, लाथा मारतात, किंवा मारहाण करतात. 32 टक्के नवऱ्यांनी पत्नी गरोदर असताना तिच्याविरोधात हिंसाचार केला आहेत. भारतात दर 60 मिनटांनी एक स्त्री कौटुंबिक हिंसेमुळे दगावते. सामाजिक संकेतामुळे स्त्रिया कौटुंबिक हिंसाचार सहन करतात. तसेच संस्कृतीची बंधने आणि आर्थिक परावलंबित्व यामुळे स्त्रियांना पतीच्या घरी राहणे भाग पाडते. कौटुंबिक हिंसाचाराला प्रतिबंध करण्यासाठी फौजदारी कायदा तर आहेच, शिवाय, अलीकडेच आलेल्या 'प्रोटेक्शन ऑफ विमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हायोलन्स' या दिवाणी कायद्याचा उद्देश स्त्रीला मदत, भरपाई व पाठिंबा पुरवणे हा आहे.

भगवती

# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष सुचना व शिफारशी

आजही भारतीय समाजात कौटुंबिक हिंसाचाराचा प्रभाव आढळून येतो.

कौटुंबिक हिंसाचार हा मानव अधिकाराचा विषय आहे.

कौटुंबिक हिंसाचारामुळे मुलांच्या वर्तणूकीत बदल होत असते.

कौटुंबिक हिंसाचार हा हुंडा प्रथेमुळे देखिल निर्माण होते.

कौटुंबिक हिंसाचारापासून हिंसामुक्त जीवन हा स्त्री च्या मानवी हक्क आहेत.

कौटुंबिक हिंसाचारामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण होते.

कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

## सूचना

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांना संरक्षण द्या. त्यांना कोणत्याही प्रकारच्या हिंसेला बळी पडू देऊ नका.

मुला- मुली मध्ये भेद भेदभाव पूर्ण वागणूक निर्माण करु नका.

महिलांना स्वतःच्या पायावर उभे होण्याचे स्वातंत्र्य द्या.

स्त्रीया व वृद्ध किंवा मुले यांच्यावर अन्याय, अत्याचार होत असेल तर आजूबाजूच्या लोकांनी त्यांची पोलीसांकडे तक्रार करा.

मुलींना शिकवून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पाठिंबा द्या मुलींना मालमत्तेत समान वाटा द्या.

त्यांना नोकरी व्यवसाय करण्याची इच्छा असेल तर त्यांना प्रोत्साहन द्या.

हिंसेचे एक प्रमुख कारण म्हणजे मुलींना ओझं मानू नका लिंग परीक्षा करु नका

कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना मदत करा त्या कायद्याची जाणीव करुन द्या.

# शिफारशी

अहवालानुसार 2008 ते 2012 या काळात हाताळलेल्या लैंगिक हिंसेच्या एकूण 94 प्रकरणांपैकी निम्मी प्रकरणे थेट हॉस्पिटलात आली होती. त्यामुळे तेथच सोयी उपलब्ध करण्याची निकड स्पष्ट होते.

लैंगिक हिंसेनंतर झालेल्या वैद्यकीय नोंदीत असे आढळले की 24 तासांच्या आत दवाखान्यात येऊनही शरीरावरील पुरावे नष्ट होतात. व्यापक पातळीवर प्रसार करत प्रशिक्षणात याचा समावेश व्हायला हवा.

बाल लैंगिक शोषण प्रतिबंध कायदा 2012 प्रमाणे पोलीसतक्रार सक्तीची असल्याने पीडित बालिकेला आधी दवाखान्यात न आणल्याने आवश्यकते आवश्यक ते उपचार तिला मिळत नाही. त्यामुळे सक्तीच्या तरतुदीबद्दल पुनर्विचार करावा.

कौटुंबिक हिंसेला बळी न पडावे यासाठी अनेक कायद्याच्या ~~अनुपक्ष~~ अनुपालनाने महिलेला हिंसेपासून मुक्त होता येते.

नोटीस देण्याच्या वेळी वधूचे वय 18 वर्षे आणि वराचे वय 21 वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे.

भगवती

Page No.
Date : / /

घरगुती हिंसाचार कायदा 2005 अंतर्गत नियुक्त केलेल्या सुरक्षा अधिकाऱ्यांना हुंडा संरक्षण अधिकाऱ्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी देखिल अधिकृत केले पाहिजेत. जेणे करुन हिंसाचारास कमी स्त्रियांचा बळी जाणार, आणि त्यांचे संरक्षण करता येईल.

महिला जिथे कायमस्वरूपी किंवा तात्पुरती वास्तव्य करत असेल, तिथुन तिला कौटुंबिक हिंसाचार होत असल्यास तक्रार दाखल करण्याची मुभा असावी.

वरील नियमांचे पालन न केल्यास जे पण व्यक्ती, स्त्रिया, वृद्ध मुले, यांच्यावर अत्याचार किंवा हिंसाचार करत असेल तर त्यांच्या साठी शिक्षेची तरतूद असावी.

भगवती

# उपाययोजना

स्त्री- पुरुष समानतेचं तत्व रुजवण्यासाठी, स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांना शिक्षण व अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

अत्याचारा विरोधात आवाज उठवण्याचे, प्रतिकार करण्याचे, मानसिक बळ स्त्रियांमध्ये निर्माण करणे. व तक्रार दाखल करण्याचे धाडस त्यांच्या मध्ये निर्माण करणे आवश्यक आहेत.

घरगुती हिंसाचाराकडे घरगुती मामला, पतीचा अधिकार म्हणून पाहण्याची समाजाची प्रवृत्ती बदलून पिडीत महिलेस मदत. हिंसाचार करणाऱ्या कुटुंबाचा निषेध, बहिष्कार केल्यास घरा- घरातील हिंसेला चाप बसेल.

कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याची माहिती सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी शाळा, महाविद्यालये, महिला मेळावा, परिषदा कार्यशाळांच्या माध्यमातून प्रयत्न करणे.

शासन, पोलिस न्यायालये या यंत्रणांनी गुन्हेगारांना पाठीशी न घालता कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

केंद्रसरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियमावली 26 ऑक्टोबर 2008 अंमलात आणली.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 498 (अ) नुसार हुंडा वा अन्य कारणासाठी स्त्रियांचा छळ करणे हा दखलपात्र व अजामिनपात्र गुन्हा मानला आहे. अशा गुन्ह्यात दोषी व्यक्तीस पती किंवा त्यांच्या नातेवाईकांना दोन वर्ष कारावासाची व दंडाची शिक्षा होऊ शकते.

या विरुद्धच्या कायद्याने हुंडाप्रथा कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमुख कारण मानले व हुंड्यासाठी होणाऱ्या छळास प्रतिबंध करण्यात आला. तसेच या अधिनियमानुसार हुंडा देणाऱ्या व घेणाऱ्या व्यक्तींना दोषी मानुन 5 वर्षे कैद 15000 रु इतका दंड होऊ शकतो.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा 2005 मध्ये करण्यात आला आहे.

भगवती

# संदर्भ ग्रंथ सूची

१. कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 * विजया रहाटकर
महाराष्ट्र राज्य महिला आयोग प्रथम आवृत्ती मे 2018

2. हिंसामुक्त जीवन * डॉ. आनंद अहंकारी
प्रकाशन हॅमो मेडिकल फाउंडेशन, अनंदूर प्रथम आवृत्ती 2 ऑक्टोबर 2006

3. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 व नियम 2006 * एस. एस. चव्हाण
जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, ठाणे प्रथम आवृत्ती 2005

४. लिंगभाव आणि हिंसाचार * विजय मारुलकर, दयावती पाडळकर
फडके प्रकाशन कोल्हापूर प्रथम आवृत्ती 2014

26.05.22